POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१६३ ● मुंबई, बुधवार, १४ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## १४ आणि १५ जानेवारीला २८० हून अधिक लोकल रद्द

## मुंबईकरांसाठी सर्वात मोठी अपडेट! तुमच्यांवर कसा होईल परिणाम?

■बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबईतील लोकल प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. कांदिवली आणि बोरिवली दरम्यान सहाव्या रेल्वे मार्गाचे बांधकाम सुरू असल्यामुळे पश्चिम रेल्वेने मंगळवार आणि बुधवारच्या रात्री मोठा बदल पाहायला मिळेल. यामुळे एकूण २८८ लोकल गाड्या रद्द होणार आहेत. १४ आणि १५ जानेवारी रोजी प्रत्येक दिवशी १४४ गाड्या चालणार नाहीत. हे काम २० डिसेंबर ते १८ जानेवारी २०२६ या काळात टप्प्याने होत असून रोजच्या लोकल सेवेत १० ते १५ टक्के कपात होत आहे.

मंगळवारी रात्री कांदिवली ते मालाड दरम्यान पॉइंट क्रमांक १०३ काढण्यासाठी ब्लॉक घेतला जाईल.




अप वेगवान मार्गावर रात्री १२ ते पहाटे ५.३० पर्यंत आणि डाऊन वेगवान मार्गावर रात्री १ ते पहाटे ४.३० पर्यंत वाहतूक थांबेल. बुधवारी रात्री पॉइंट क्रमांक १०२ काढण्यासाठीही असाच ब्लॉक असेल. या दोन्ही दिवशी अप आणि डाऊन वेगवान मार्गावर ठरलेल्या वेळेत गाड्या चालणार नाहीत. हे काम सुरळीतपणे पूर्ण करण्यासाठी हे आवश्यक आहे.

लोकल गाड्यांवर या ब्लॉकचा मोठा परिणाम होईल. पाचव्या मार्गावरील दुरुस्ती, वेग मयार्दा आणि इतर कामांमुळे अनेक फेऱ्या रद्द करण्यात येत आहेत. प्रवाशांना गर्दी आणि उशीराचा सामना करावा लागेल. रोज लाखो मुंबईकर लोकलने प्रवास करतात, या बदलामुळे मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होणार आहे.

या काळात पर्यायी वाहतुकीचा विचार करा जसे की बस किंवा मेट्रो. रेल्वे स्टेशनवर जास्त गर्दी होऊ शकते, म्हणून मास्क आणि सोशल डिस्टन्सिंग पाळा. हे तात्पुरते बदल असले तरी दीर्घकाळासाठी फायद्याचे आहेत. रेल्वे प्रशासनाने माफी मागितली असून, प्रवाशांच्या सोयीचा प्रयत्न करत आहे. एकूण हे काम मुंबईच्या विकासासाठी पाऊल आहे.

### एक्सप्रेस गाड्यांच्या वेळापत्रकातही बदल

फक्त लोकलच नव्हे तर एक्सप्रेस गाड्यांच्या वेळापत्रकातही बदल झाले आहेत. १३ आणि १४ जानेवारी रोजी नंदुरबार-बोरिवली आणि अहमदाबाद-बोरिवली एक्सप्रेस फक्त वसई रोडपर्यंतच धावतील. १४ आणि १५ जानेवारी रोजी बोरिवलीहून सुटणाऱ्या काही एक्सप्रेस गाड्या वसई रोडपर्यंत मर्यादित राहतील. काही गाड्या पयार्यी मार्गाने वळवल्या जातील, ज्यामुळे प्रवासाचा वेळ वाढू शकतो. लांब पल्ल्याच्या प्रवाशांनी नवीन वेळापत्रक तपासावे, असे आवाहन करण्यात आले.

### सहाव्या मागार्चे काम

मुंबईच्या रेल्वे सेवेसाठी महत्त्वपूर्ण आहे. गेल्या वर्षी खार रोड ते कांदिवलीपर्यंत हा मार्ग सुरू झाला होता. आता कांदिवली ते बोरिवलीपर्यंत विस्तार होत आहे. यामुळे भविष्यात लोकल गाड्या अधिक वेळेवर धावतील आणि फेऱ्यांची संख्या वाढेल. मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येला सामावण्यासाठी हे प्रकल्प आवश्यक आहे.

## एका वेळी २ प्रभागांचीच होणार मतमोजणी

■मुंबई। प्रतिनिधी,

महापालिका निवडणुकीत मतमोजणीच्या दिवशी एका वेळी दोनच प्रभागांची मोजणी केली जाणार असून पहिल्या दोन प्रभागांची मोजणी पूर्ण झाल्यानंतरच पुढील प्रभागाची मतमोजणीला सुरुवात केली जाईल असे महापालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ भूषण गगराणी यांनी स्पष्ट केले. त्यामुळे प्रत्येक प्रभागाची मतमोजणीची प्रक्रिया टप्पानिहाय केली जाणार असल्याने मतमोजणीची प्रक्रिया लांबली जाण्याची शक्यता आहे.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी १७०० उमेदवार निवडणूक रिंगणात आहे. यासाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून दुसऱ्याच दिवशी म्हणजे १६ जानेवारी रोजी मतमोजणी केली जाणार आहे. या मतमोजणीमध्ये एकाच वेळी १४ टेबल ठेवले आहेत.त्यामुळे एकाच वेळी १४ टेबल अशाप्रकारे २८ टेबल ठेवली जाणार आहे. या १४ टेबलांवर एका प्रभागाची आणि दुसऱ्या १४ टेबलावंर दुसऱ्या प्रभागाची मतमोजणी केली जाणार आहे. या १४ टेबलांमध्ये पार्टीशन टाकून ही मतमोजणी केली जाईल.एका वेळी दोन प्रभागांची मतमोजणी केली जाईल आणि एका प्रभागाची



मोजणी पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या प्रभागाची मोजणी केली जाईल आणि अशाप्रकारे एका वेळेला दोन प्रभागांमध्ये मतमोजणी केली जाईल,असे जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ भूषण गगराणी यांनी स्पष्ट केले जाईल.

### मतदानाच्या दिवशी शेवटच्या वेळी मिळणार टोकन

निवडणुकीच्या मतदानासाठी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच अशी मतदानाची वेळ आहे. परंतु साडेपाच वाजेपर्यंत जे मतदान केंद्रात पोहोचतील त्यांना निवडणूक निर्णय अधिकारी हे टोकन उपलब्ध करून देत त्यांना मतदानाची संधी देणार आहे. टोकन दिल्यानंतर कुणालाही मतदान केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. त्यामुळे मतदान करण्याची वेळेची मुदत संपुष्टात येण्यापूर्वी मतदान केंद्रात पोहोचल्यास टोकन देत मतदान करण्याची संधी दिली जाणार असल्याने वेळेत मतदान केंद्रात पोहोचणाऱ्या प्रत्येक मतदानाला मतदानाचा हक्क बजावण्याचा अधिकार मिळणार आहे.



## “प्रेमांकुर”काव्यसंग्रह प्रकाशन

### (डॉ.सौ.पुष्पांजली आप्पाजी कुंभार एम्.ए.,एम्.एड.,पीएच. डी.)

■बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी नेरूळ येथील फ्रुटवाला कल्चरल सेंटर(मराठा हॉल)येथे प्रसिद्ध वक्ते श्री अरूण म्हात्रे यांच्या शुभहस्ते कवयित्री डॉ.सौ.पुष्पांजली आ.कुंभार यांच्या पहिल्या वहिल्या ह्लप्रेमांकुरह्लकाव्यसंग्रहाचे शानदार प्रकाशन झाले.

श्री सुनील उंब्रजकर, पुणे, यांच्या वेदांतश्री प्रकाशनाद्वारे अतिशय आकर्षक मुखपृष्ठ व प्रत्येक कवितेवर शोभेसे रेखाचित्र रेखांटन करून आकर्षक अशी छपाई करण्यात आली आहे. प्रमुख पाहुण्या कवयित्री व प्रसिद्ध निवेदिका सौ.साधना जोशी होत्या. शिस्तबद्ध,आटोपशीर पद्धतीने समोरच्या श्रोत्यांना सतत जागृत व हसतमुख ठेवणारा हा कार्यक्रम फार देखणा होता. श्री. अरूण म्हात्रे प्रकाशनानंतर बोलताना म्हणाले- ह्लकवयित्री पुष्पांजली यांनी हिरवागार निसर्ग मनांत साठवून कोऱ्या कागदावर अलगद जसाच्या तसा उतरविला आहे.त्यांच्या कविता निसगार्चे आणि निसर्ग प्रेमाचे गाणे आहे. प्रेमांकुर कवितासंग्रह म्हणजे मोगऱ्याची सुगंधी फुले एकत्र करून केलेला एक सुंदर गजरा आहे. त्याचा सुगंध साहित्य विश्वात दरवळल्याशिवाय राहणार नाही. प्रमुख पाहुण्या सौ. साधना जोशी यांनी अतिशय अभ्यासपूर्ण असे डॉ.पुष्पांजली यांच्या कवितांचे रसग्रहणात्मक वर्णन करून श्रोत्यांची दाद मिळवली.कवयित्रीच्या ‘इंद्रधनुष्य’ या काव्य कल्पनेशी अतिशय मार्मिक विवेचन करून प्रेक्षकांच्या टाळ्या मिळवल्या.यशवंत देव उद्धृत करताना किती गं तुझे रंग, किती गं तुज्या छाया, दोनच माझे डोळे,उत्सव जातो वाया. डोळ्यात साठवतो म्हटलं तरी सर्व साठवण्यास मयार्दा पडतात असे कवयित्रीचे कौतुक केले. वेदांतश्रीचे प्रकाशक उंब्रजकर यांनी हा काव्यसंग्रह आपले २२६ वे पुस्तक असून त्यांच्या छपाईस पुरेपूर न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे असे प्रतिपादिले. डॉ.सौ.पुष्पांजली कुंभार या स्वतः उच्च शिक्षित आहेत. एम्.ए.,एम्.एड. , पीएच.डी.( शिक्षण शास्त्र) अशा पदव्या संसाराचा गाडा चालवताना संपादन केल्या. त्यांनी प्राध्यापक म्हणूनही काम केले. दोन्ही मुलींच्या (अनुराधा व श्रध्दा )उज्वल भविष्याकरिता आपल्या करिअरचा त्याग करून एकीला कायद्यातील तज्ञ तर दुसरीला इंटरॲक्टीव्ह डिझाईन मध्ये पदव्युत्तर स्नातक बनविले. दोघीही परदेशात स्थायिक होत आहेत. डॉ.पुष्पांजली यांनी आपल्या अनेक कविता मागील पार्श्वभूमी सांगून हा काव्यसंग्रह कसा शेवटीप्रेमाकडे वळतो याचे खुमासदार विश्लेषण केले आहे. सौ. माधवी सूर्यवंशी यांनी स्वागतगीत म्हटले तर सौ. निर्मला भागवत यांनी आभार प्रदर्शन केले. शेवटी सामुदायिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमात प्रकाशन होवू घातलेल्या ह्यप्रेमांकुरह्ल काव्यसंग्रहाची पुष्पवृष्टी करून दिंडी काढली. मोठ्या प्रमाणात- सुमारे ७५ टक्के महिलावर्ग उपस्थित होता. विशेष अतिथी म्हणून प्रसिद्ध उद्योगपती श्री नितीन भागवत, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे मुख्य अभियंता श्री एस के सुरवसे व त्यांच्या पत्नी, सपत्न ीक पोलिस अधिकारी श्री गंगाधर देवडे,कवि विलास कुंभार,निवेदक श्री नारायण एखतपूरकर, अशोक महाराज गोरे, सपत्न ीक डॉ.राजाळे, साहित्यिका अनुसया कुंभार,बिल्डर श्री हर्षद ठुमर व पत्नी रेखा, श्री. व सौ. भारती शिंदे, सौ.इंदू वार्ष्णेय यांनी कार्यक्रमाची शोभा वाढविली. कवयित्रीचे पती डॉ. ए.टी.कुंभार ( निवृत्त आय.ए.एस. ) यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.

## निवडणूक काळात तब्बल ३ कोटी १० लाखांची रोख रक्कम जप्त

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीशी संबंधित आचारसंहितेच्या काळात तब्बल ३ कोटी १० लाख १७ हजार २० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. तर तब्बल ०८ लाख ३ हजार ३३० रुपये किंमतीची १२३७ लिटर दारु जप्त करण्यात आली आहे. ५५ किलोग्रॅम अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. याचा बाजारभाव ४४ कोटी ९५ लाख ०७ हजार २३७ रुपये एवढी आहे. महापालिकेच्या निवडणूक भरारी पथकामार्फत ही कारवाई करण्यात आली आहे.

मुंबई महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २ हजार ०२५ करता आचारसंहितेच्या काळात महापालिकेच्या भरारी पथकाच्यावतीने धडक कारवाई करण्यात येत आहे. महापालिका आचारसंहिता कक्षाच्यावतीने १६ जणांवर गुन्हे अदखलपात्र आणि १३ जणांवर गुन्हे दखलपात्र नोंदवण्यात आले आहे. तसेच ५२ दारुगुळा तसेच परवानाधारक व्यक्तींकडून ३६ रिव्हॉल्वर जप्त करण्यात आली आहे. ११५ धारदार शस्त्रे पोलिसांच्या मदतीने जप्त करण्यात आली आहे. महापालिका निवडणुकीसाठी आचारसंहिता कक्षाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या या कारवाईत प्रतिबंधात्मक कारवाई करताना २४५० जणांवर प्रलोभन तसेच इतर अन्वये कारवाई करण्यात आली आहे. ५१ जणांना गुन्हेगार घोषित करण्यात आले आहे. १०६ जणांना फरारी तसेच फरारी आरोपी घोषित करण्यात आले आहे, तसेच एमपीडीए अंतर्गत दोघांवर कारवाई करण्यात आली आहे.

### मोबाईल बंदी कायम, पण पूर्णपणे बंद करून मतदान केंद्रात नेता येवू शकतो...

मागील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मतदान केंद्रात मोबाईल नेण्यास पूर्ण बंदी घालण्यात आली होती, ती बंदी याही निवडणुकीत कायम आहे.मतदान केंद्रात मोबाईल नेता येईल किंवा नाही याबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या कोणत्याही सूचना नसल्याने मागील निवडणुकीप्रमाणे यंदाच्या महापालिका निवडणुकीतही तेच नियम कायम आहेत.

मतदान केंद्रात मोबाईल फोन नेता येणार नाही. परंतु जर आप मोबाईल फोन जवळ बाळगणार असाल तर तो पूर्णपणे बंद करून खिशात किंवा पर्समध्ये टाकून नेवू शकता असेही महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले.

## दुबार मतदारांपैंकी ४८,००० मतदारांचा मतदानाचा मार्ग मोकळा

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी मतदार याद्या बनवताना दुबार मतदारांचा शोध घेण्यात येत असून तब्बल १ लाख ६५ हजार दुबार मतदारांपैंकी ४८ हजार दुबार मतदारांनी आपले परिशिष्ट दोन लिहून दिले आहे. त्यामुळे त्यांनी लिहून दिलेल्या मतदान केंद्रात त्यांना मतदान करता येणार असून त्यांच्या नावासमोरील स्टार काढून टाकण्यात आला आहे. तसेच ज्यांनी परिशिष्ट दोन भरुन दिले नसल्यास त्यांना मतदान केंद्रावर दोन पुरावे सादर करणारी ओळखपत्रे आणि परिशिष्ट दोन भरुन दिल्यावर मतदानाचा अधिकार दिला जाईल,असे महापालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ भूषण गगराणी यांनी स्पष्ट केले.

मुंबईतील दुबार मतदारांच्यासंदभार्तील सर्व प्रकारची प्रक्रिया पूर्ण करून ११ लाख १ हजार ५०६ दुबार मतदारांपैंकी केवळ १ लाख ६५



हजार निव्वळ दुबार मतदार आढळून आले आहेत. त्या सर्व दुबार मतदारांची घरोघरी जावून स्थळ पाहणी करून त्यांच्याकडून मतदान कुठे करणार याची माहिती जाणून घेतली. यानुसार तब्बल ४८ हजार ६२८ दुबार मतदारांनी परिशिष्ट दोन सादर करून आपण कुठल्या मतदान केंद्रात मतदान करणार याची माहिती दिली आहे. त्यानुसार त्यांच्या नावासमोरील स्टार काढून टाकण्यात आला असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ भूषण गगराणी यांनी दिली आहे.

परिशिष्ट दोन सादर करणाऱ्या मतदारांच्या नावासमोर शिक्के मारुन त्यांना मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. परंतु ज्या दुबार मतदारांनी परिशिष्ट दोन भरुन दिले नाही आणि ते जर मतदान करण्यासाठी आले तर त्यांच्याकडून दोन ओळखपत्र पुरावे म्हणून स्वीकारुन त्यांच्याकडून परिशिष्ट दोन भरुन घेतले जाईल आणि त्यानंतर त्यांना मतदानाचा अधिकार दिला जाईल. याबाबत पीआरओंना योग्यप्रकारचे प्रशिक्षण दिले असून याबाबत कुणाकडून हुज्जत घालण्याचा प्रकार घडणार नाही असाही विश्वास व्यक्त केला.

दुबार मतदारांसंदर्भात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विधान करत अशाप्रकारचे दुबार मतदार मतदान करण्यास आल्यास त्यांच्या तोडून काढा असे म्हटले आहे. यासंदर्भात बोलतांना डॉ भूषण गगराणी यांनी यासंदर्भात कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून योग्य ती काळजी घेण्यात आली आहे. त्यामुळे अशाप्रकारची घटना घडण्याची शक्यता नसेल तरीही आमची यंत्रणा यासाठी सज्ज आणि

## ५ कोटींच्या खंडणीसाठी आरटीआय कार्यकर्त्याची आंध्रच्या खासदाराला धमकी

## पीएला चाकू दाखवत ७० हजारही लुटले, मुंबईतून अटक




### पीएला चाकूचा धाक दाखवून लुटले

धमकीचे कॉल सुरू झाल्यानंतर खासदारांनी आपल्या स्वीय सहाय्यकाला आंध्र प्रदेशातील मेदुकूर परिसरात आरोपीशी चर्चा करण्यासाठी पाठवले. मात्र, भेटीदरम्यान आरोपीने अचानक चाकू काढून पीएला धमकावले आणि त्याच्याकडील ₹.७० हजार रोख रक्कम जबरदस्तीने लुटली, असा आरोप आहे.

### गंभीर कलमांतर्गत गुन्हा दाखल

या प्रकरणी खासदार कार्यालयाकडून तक्रार दाखल झाल्यानंतर मेदुकूर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता अंतर्गत खंडणी, दरोडा आणि धमकीसंबंधी गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला. तपासात आरोपीचे नाव रुशांत जयकुमार वडके असे असल्याचे उघड झाले आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

आंध्र प्रदेशच्या पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील एका खासदाराला ब्लॅकमेल करून ५ कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. माहितीच्या अधिकाराचा गैरवापर करून खासदाराकडून तब्बल ₹.५ कोटींची खंडणी मागितल्याप्रकरणी एका आरटीआय कार्यकर्त्याला मुंबईतून अटक करण्यात आली आहे. आरोपीने खासदाराच्या स्वीय सहाय्यकाला चाकूचा धाक दाखवून ₹.७० हजारांची लूट केल्याचाही गंभीर आरोप आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने स्वतःला आरटीआय कार्यकर्ता असल्याचे सांगत खासदाराविषयी मिळवलेली माहिती केंद्रीय तपास यंत्रणांकडे देण्याची धमकी दिली होती. खंडणी न दिल्यास गंभीर परिणाम होतील, अशी सतत धमकी दिल्याने खासदार कार्यालयात खळबळ उडाली होती.

### मुंबईतून अटक

घटनेनंतर आरोपी मुंबईत लपल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार आंध्र प्रदेश पोलिसांचे पथक मुंबईत दाखल झाले आणि व्ही.पी. रोड पोलिसांच्या मदतीने आरोपीला अटक करण्यात आली.

### पुढील तपास सुरू

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आरोपीने आरटीआय अर्जांमधून मिळालेल्या माहितीचा वापर करून वारंवार ब्लॅकमेल केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहे का, याचा तपास सुरू असून पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

या घटनेमुळे आरटीआयच्या गैरवापराचा गंभीर मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

## पाथरवट समाज उन्नती मंडळ कल्याण क्रिकेट चषक २०२६ धुमधडाक्यात आयोजन केले होते

■मुंबई। प्रतिनिधी,

कल्याण येथे सालाबाद प्रमाणे क्रिकेट चषक २०२६चे आयोजन केले होते दरवर्षी प्रमाणे काही वर्षी सामने धुमधडाक्यात साजरे केले पाथरवट समाज उन्नती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष माननीय पद्माकर दादा लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टर किरण टोकेकर यांनी नियोजन करून सर्वांच्या सहकार्याने क्रिकेटचे सामने पार पाडले जर सर्वांचे सहकार्य असेल तरच कोणते काम चांगल्या रीतीने होते असे पाथरवट समाजाचे अध्यक्ष डॉक्टर किरण टोकेकर यांनी सांगितले कारण समाज एकत्र यावा सामाजिक बांधिलकी राहावी काहीतरी चांगले काम करावे या उद्देशाने तळमळीने प्रयत्न करतात तर विश्वकर्मा जयंतीला सर्वांनी एकत्र यावे कारण ही जयंती माझ्या घरची नाही विश्वकर्मा जयंती सर्वांनी एकत्र मिळून केली पाहिजे त्यामुळे प्रत्येकानं सामाजिक भान ठेवून काम करावे ज्येष्ठ नागरिक श्री भटु टोकेकर हे शेवटपर्यंत उपस्थित होते

११ जानेवारी २०२६ला इन्फिनिटी तर्फे संकेत कॉलेजच्या मागे चिंचपाडा कल्याण पूर्व येथे क्रिकेटचे सामने धुमधडाक्यात झाले तसेच ठाण्याचे जिल्हा माहिती अधिकारी मा.मनोज सानप सर यांनी सर्व क्रिकेट टीमचे खूप खूप अभिनंदन व तर पत्रकार हर्षल खेडकर यांनी सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.





## आपच्या उमेदवारावर विरोधी कार्यकर्त्याने बंदूक उगारली, पण स्थानिकांनी त्यालाच दिला चोप

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापत असतानाच एक धक्कादायक घटना समोर आली आहे. नाशिकमधील प्रभाग क्रमांक ११ मध्ये आम आदमी पक्षाच्या (आप) उमेदवार समाधान आहिरे यांच्यावर बंदूक उगारल्याची गंभीर घटना घडली असून, या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सुदैवाने, प्रसंगावेळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी प्रसंगावधान राखत बंदूक उगारलेल्या व्यक्तीला पकडून चोप दिला, त्यामुळे मोठा अनर्थ टळला. ही घटना प्रबुद्ध नगरमध्ये घडली. दरम्यान, ही बंदूक खरी आहे की नकली? याचा तपास पोलिसांकडून करण्यात येतोय.

या प्रकरणात महत्त्वाचा दावा समोर आला असून, बंदूक उगारलेला व्यक्ती हा प्रभागातील माजी नगरसेवक आणि सध्या कारागृहात असलेले प्रकाश लोंढे यांचा कार्यकर्ता असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या घटनेमुळे राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असून, निवडणुकीदरम्यान वाढणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तींबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. अचानक घडलेल्या या घटनेमुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण पसरले. मात्र, उपस्थित नागरिकांनी धाडस दाखवत तात्काळ त्या व्यक्तीला पकडले आणि त्याला चोप दिला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी जमावाच्या तावडीत सापडलेल्या आरोपीला ताब्यात घेतले असून, त्याच्याकडील बंदूक जप्त करण्यात आली आहे. प्राथमिक तपासात बंदूक खऱ्या स्वरूपाची असल्याची शक्यता वर्तवण्यात येत असून, याबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत.

‘आप’ पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला आहे. संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या घटनेनंतर प्रभाग ११ मध्ये तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी परिसरात बंदोबस्त वाढवला आहे. पोलीस सध्या आरोपीची कसून चौकशी करत असून, तो कोणाच्या सांगण्यावरून हा प्रकार करण्यासाठी आला होता का, याचा तपास सुरू आहे. तसेच प्रकाश लोंढे यांच्याशी या घटनेचा थेट संबंध आहे का? याचीही पडताळणी केली जात आहे. या घटनेमुळे नाशिक महानगरपालिका निवडणुकीदरम्यान कायदा-सुव्यवस्थेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## पनीर-पुदिना कटलेट

**साहित्य :** २५० ग्राम ताजं पनीर, १/२ कप शिंगाड्याचे पीठ, २-३ हिरव्या मिरच्या, १/२ चमचा वाळवलेली पुदिन्याची पूड, १/२ चमचा लिंबाचा रस, बारीक चिरलेली कोथिंबीर, उपवासाचे मीठ चवीप्रमाणे.

**कृती :** पनीर कटलेट्स करण्यासाठी सर्वप्रथम पनीरला किसून घ्या. हिरव्या मिरच्यांना बारीक चिरून शिंगाड्याच्या पिठात पनीर आणि मिरच्या घाला. आता उरलेले साहित्य वाळवलेली पुदिन्याची पूड, लिंबाचा रस, मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून त्याला मिक्स करून हवे त्या आकाराचे कटलेट करा. तवा गरम करून त्यावर थोडे तूप किंवा शेंगदाण्याचे तेल टाकून दोन्हीकडून कुरकुरीत खमंग शॅलो फ्राय करून घ्या. तयार कटलेट्सला दही किंवा हिरव्या चटणीसोबत सर्व्ह करा.



# आपल्या स्वयंपाकघरातच आहेत सौंदर्यप्रसाधने

तुमच्या केसांपासून ते पायांच्या नखांपर्यंत सर्व गोष्टींची निगा राखण्यास मदत करण्यासाठी विविध तऱ्हेची सौंदर्यप्रसाधने बाजारामध्ये उपलब्ध आहेत. पण या सर्व प्रसाधनांमध्ये अगदी कमी प्रमाणात का होईना, पण रसायने असतातच. त्यामुळे क्वचितप्रसंगी या सौंदर्यप्रसाधनांमुळे ॲलर्जीदेखील उद्भवू शकते. हा धोका टाळायचा असेल, तर घरी तयार केलेली, नैसर्गिक पदार्थ असलेली प्रसाधने वापरणे कधीपण अधिक सोयीस्कर आणि फायद्याचे असते. घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडाफार वेळ खर्ची घालावा लागत असला, तरी त्यापासून आपल्या त्वचेला किंवा केसांना मिळणारे फायदे पाहता, घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडा वेळ जरूर द्यावा.





**साखर :** थंडीमध्ये किंवा उन्हाळ्यामध्ये ओठ कोरडे पडून खरखरीत होतात. याचा उपाय आपल्या स्वयंपाकघरामध्ये अगदी सहज उपलब्ध आहे, तो म्हणजे साखर. साखरेमुळे त्वचेवरील मृत पेशी हटवल्या जाऊन, त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढते. याकरिता एक टीस्पून खोबरेल तेलामध्ये एक लहान चमचा मध मिसळावा. या मिश्रणात दोन मोठे चमचे साखर घालून, मग थोडासा लिंबाचा रस घालावा आणि हे मिश्रण व्यवस्थित एकत्र करावे. ही तयार झालेली पेस्ट ओठांवर हळुवार गोलाकार चोळावी. दहा मिनिटे ही पेस्ट ओठांवर राहू देऊन, त्यानंतर पाण्याने धुवून टाकावी. ओठ टॉवेलने हळुवार कोरडे करून व्हॅसलिन लावावे. या उपायाने ओठ नेहमी मृदू राहतील.



**नारळ :** नारळाच्या दुधामध्ये 'ई' जीवनसत्त्व व केसांना पोषक नैसर्गिक तेले मुबलक मात्रेमध्ये असतात. ॲवोकाडोमध्ये केसांच्या पोषणासाठी आवश्यक प्रथिने व केसाच्या मुळांना पोषक तत्त्वे असतात. नारळाचे दूध व ॲवोकाडो वापरून तयार केलेला मास्क केसांसाठी वापरला असता, केस चमकदार आणि मुलायम बनतात. हा मास्क तयार करण्यासाठी ॲवोकाडो आणि नारळाचे दूध एकत्र करून त्यांची पेस्ट तयार करावी. ही पेस्ट केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत व्यवस्थित लावून घ्यावी. अर्धा तास ही पेस्ट केसांवर राहू देऊन त्यानंतर केस धुवावेत. या हेअर मास्कमुळे केसांच्या मुळांना ताकद मिळून, केसांची वाढ चांगली होते.



**ऑलिव्ह ऑईल :** नैसर्गिक मेकअप रिमूव्हर म्हणून ऑलिव्ह ऑईलचा वापर करावा. मेकअपसाठी वापरण्यात येणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांमध्ये थोड्या प्रमाणात ॲस्ट्रिंजंट असते, ज्यामुळे आपली त्वचा कोरडी पडू लागते. मेकअप उतरवण्याकरिता ऑलिव्ह ऑईल वापरल्याने मेकअप संपूर्णपणे साफ होतोच, पण त्याशिवाय त्वचेचा कोरडेपणा दूर होऊन, त्वचेला आर्द्रता मिळते.

**टोमॅटो :** त्वचेची निगा राखण्याकरिता प्रत्येक वेळी ब्युटी पार्लरकडे धाव न घेता, घरच्या घरीच उत्तम फेस मास्क तयार करावा. नितळ, सुंदर त्वचेकरिता टोमॅटो अतिशय चांगला पर्याय आहे. टोमॅटोमधील 'अ' जीवनसत्त्व त्वचेवरील डाग हलके करण्यास सहाय्यक आहे. तसेच यामध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असल्याने त्वचेचा पोत सुधारून, त्वचा चमकदार बनते. हा मास्क बनवण्याकरिता एका टोमॅटोची पेस्ट चेहऱ्यावर लावून वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर चेहरा थंड पाण्याने धुवावा. या उपायाने त्वचा त्वरित उजळते.

**मध आणि बदामाची पूड :** हात कोरडे पडून रखरखीत होत असल्यास त्यासाठी मास्क घरच्या घरी तयार करता येतो. एक लहान चमचा मधात थोडा लिंबाचा रस घालावा. त्या मिश्रणामध्ये एक मोठा चमचा बदामाची पूड व एक लहान चमचा अक्रोडची पूड घालावी. अक्रोडची पूड नसल्यास एक चमचा सूर्यफुलाचे तेल घालावे व हे मिश्रण हाताना चोळावे. पाच मिनिटांनी हात गार पाण्याने स्वच्छ धुवून टाकावेत. या उपायाने हात मुलायम राहतील.

# शहाळे : आरोग्याचा खजिना



कोवळा नारळ सर्वांनाच आवडतो. पण तो आरोग्यदायी घटकांचा खजिना असतो हे अनेकांना माहीत नसते. मोठे सेलिब्रिटीज, चित्रपट अभिनेते आणि अभिनेत्रींनाही नारळाच्या पाण्याचे महत्त्व कळते. अर्थात ते त्यांना कळते आणि ते हॉटेलातल्या महागड्या पेयांपेक्षाही शहाळे पिणे पसंत करतात. सामान्य लोकांनी त्यांचे अनुकरण म्हणून नाही पण नारळाचे महत्त्व समजून घेऊन त्याचा समावेश आपल्या रोजच्या आहारात केला पाहिजे. कोवळा नारळ हे निसर्गाने आपल्याला दिलेले वरदान आहे. २००६ साली करण्यात आलेल्या एका पाहणीनंतर शहाळ्याची वैशिष्ट्ये जर्नल ऑफ मेडिसिनल फूड या मासिकांत प्रकाशित करण्यात आली होती. त्यात शहाळ्याने शरीरातले कोलस्टेरॉल कमी होते असे म्हटले होते.

**आपल्याला** निसर्गाने नारळातून जे काही अनमोल असे दिले आहे त्यात कोणीही कसलीही भेसळ करू शकत नाही, हे त्याचे खास वैशिष्ट्य आहे. नारळाचे पाणी नेहमीच फ्रेश असते. ते कधी शिळे होत नाही. ते थंड असते. रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास त्याचा उपयोग होतो. एकदा याबाबत एक पाहणी करण्यात आली असता असे लक्षात आले की, पाहणीत गुंतलेल्या रुग्णांपैकी ७१ टक्के रुग्णांचा रक्तदाब कसलीही औषधे न देता केवळ शहाळ्याच्या पाण्याने कमी झाला. शहाळ्यातल्या मॅग्नेशियममुळे इन्सुलीन सेन्सिटीव्हिटी वाढते आणि मधुमेहाच्या रुग्णाला दिलासा मिळतो. ब्लड शुगर लेव्हल कमी होते. नारळाच्या पाण्यातले सोडियम आणि काही जीवनसत्त्वे ही ब्लड शुगर कमी करण्यास मदत करीत असतात. हे पाणी फ्री पार्टिकल्स आणि क्रिस्टल्स तयार करण्यास प्रतिबंध करते त्यामुळे किडनी स्टोन तयार होण्याचे टळते. काही कारणाने आणि अन्नात दोष निर्माण झाल्याने पचनशक्तीवर काही विपरीत परिणाम झाला असेल तर नारळाचे पाणी दिवसातून दोन वेळा प्यावे त्यामुळे पचनशक्ती ताळ्यावर यायला मदत होते. कारण या पाण्यात तंतुमय पदार्थ मोठ्या प्रमाणावर असतात. काही वेळा जुलाब होतात आणि डीहायड्रेशन होते. अशा वेळी नारळाचे पाणी प्यावे त्यामुळे शरीरातले पाण्याचे प्रमाण वाढते आणि डीहायड्रेशनमुळे आलेला अशक्तपणा कमी होतो. या पाण्याने चेहऱ्यावर तकाकी येते. केसही चांगले होतात. जगात गाजलेल्या काही टेनिसपटूंनी आपल्या तंदुरुस्तीचे रहस्य कोकोनट वॉटर हेच असल्याचे म्हटले होते. काही मॅरेथॉनपटूंनीही शहाळ्याला श्रेय दिले होते.



# 'ग्रीन टी'च्या अतिसेवनामुळे होऊ शकतात या समस्या

मागील काही वर्षांत भारतात ग्रीन टीचे सेवन अधिक वाढले आहे. ग्रीन टी आरोग्यासाठी चांगले आहे, यात शंकाच नाही. ग्रीन टीमध्ये अनेक प्रकारचे अँटीऑक्सिडेंट्स असतात. जे शरीरातील मेटाबॉलिज्म सुधारते, कॉलेस्ट्रॉल कमी करते. ग्रीन टी जिंक, मॅग्नीज आणि व्हिटामीन ए, बी, सी ची मात्रादेखील असते. मात्र हे सर्व फायदे असले तरी ग्रीन टीच्या अतिसेवनामुळे आरोग्याला देखील नुकसान पोहोचते.



**तोंडात फोडी येणे :** ग्रीन टीमध्ये टॅनिंस तत्त्व असते. जास्त ग्रीन टी प्यायल्याले टॅनिंस त्वचा कोरडी पडणे, तोंड कोरडे पडणे, पोट दुखणे आणि तोंडात फोडी येणे यासारख्या समस्या होतात.

**ब्लड प्रेशर वाढते :** अधिक प्रमाणात ग्रीन टीचे सेवन केल्याने ब्लड प्रेशरचा देखील धोका निर्माण होतो. ग्रीन टीमध्ये कॅफिन अधिक मात्रेत असतात. याच्या अधिक सेवनाने हृदयावर दबाव पडतो व तुमचे ब्लड प्रेशर वाढते.

**अशक्तपणा होऊ शकतो :** ग्रीन टीमध्ये काही असे तत्त्व असतात, जे शरीरातील आयरनला (लोह) शोषून घेण्यापासून रोखते. त्यामुळे तुम्ही ग्रीन टीचे अधिक सेवन करत असाल तर तुम्ही ज्या पदार्थांचे सेवन करता त्यातील आयरन शरीराला मिळणार नाहीत. अशा परिस्थितीत रेड ब्लड सेल्स कमी होतात आणि अशक्तपणा येऊ शकतो.

**मानसिक तणाव आणि चिंता वाढणे :** ग्रीन टी तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. मात्र अति सेवनामुळे याचा उलट परिणाम होऊन मानसिक तणाव आणि चिंतादेखील वाढते.

# गुणांचा खजिना - घृतकुमारी (ॲलोवेरा/कोरफड)

**ॲलो**वेरा आपल्या घरामध्ये किंवा ऑफिसमध्ये विनासायास लावता येण्यासारखे असते. आजकाल ॲलोवेराचे आरोग्याच्या दृष्टीने फायदे समोर यावयास लागल्याने रस, जेल अशा अनेक प्रकारे लोक ॲलोवेराचा उपयोग करताना दिसत आहेत. दात घासल्यानंतरही दातांमध्ये प्लाक किंवा किटाणू राहतातच. त्यामुळे तोंडामधून क्वचित दुर्गंधी येऊ लागते. ही दुर्गंधी येऊ नये यासाठी माऊथवॉश उपयोगात आणला जातो. ॲलोवेराच्या रसाचा वापरदेखील प्राकृतिक माऊथवॉश म्हणून करता येतो. या रसामुळे तोंडातील प्लाक आणि किटाणू दूर होऊन दातांचे आरोग्य चांगले राहते. ॲलोवेराचा वापर माऊथवॉश म्हणून केल्याने हिरड्याही बळकट होतात. कित्येकदा जेवण जास्त झाल्याने, जेवणाच्या वेळा गडबडल्याने किंवा जास्त तिखट, मसालेदार पदार्थ खाल्ल्याने छातीत जळजळ होत असल्याची भावना होते किंवा ॲसिडीटी होते. अशावेळी ॲलोवेराच्या रसाच्या सेवनाने फायदा होतो. यामुळे छातीतील जळजळ दूर होऊन ॲसिडीटीही कमी होते. तसेच दररोज सकाळी रिकाम्या पोटी ॲलोवेराचा रस कोमट पाण्यातून घेतल्यास पोट साफ होण्यास मदत होते. केस गळत असल्यास ॲलोवेराचा गर केसांना लावल्याने फायदा होतो. तसेच चेहऱ्यावर उष्णतेमुळे मुरुमे येत असल्यासही ॲलोवेराच्या गराने फायदा होतो. या गराने त्वचेचा रंग उजळण्यास व पोत सुधारण्यास मदत होते. त्याचमुळे पुष्कळशा स्कीन क्रीम्समध्ये ॲलोवेराच्या गराचा अंश मिसळलेला असतो. ॲलोवेराच्या गराच्या वापराने वयपरत्वे त्वचेवर आलेल्या सुरकुत्याही कमी होतात व त्वचा सुंदर दिसू लागते.



# जुन्या मोबाइल फोनचा स्पीड कसा वाढवायचा? जाणून घ्या सोप्या ट्रिक्स

अनेक वर्ष एकच मोबाइल फोन वापरल्यामुळे तो स्लो होऊ शकतो. असा स्मार्टफोन काही ट्रिक्सच्या मदतीने फास्ट करता येतो. यात फॅक्ट्री रीसेट, अँड्रॉइड अपडेट, फोन स्टोरेज क्लियर करणे, लाइट ॲप्सचा वापर इत्यादी ऑप्शन आहेत.



असे अनेक लोक आहेत जे एक मोबाइल कमीत कमी ३-४ वर्ष वापरतात. विशेषतः मीडिल क्लास कुटुंबात युजर एकच स्मार्टफोन अनेक वर्ष वापरतात. परंतु स्मार्टफोन जुना झाल्यावर त्याची परफॉर्मन्सदेखील स्लो होऊ लागतो. त्यामुळे रोज फोन वापरताना समस्या येऊ लागतात. ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही काही ट्रिक्स सांगितल्या आहेत ज्यामुळे जुन्या फोनचा स्पीड वाढू शकतो.

फॅक्ट्री रीसेटमुळे अनेक समस्या सोडवता येतात. फॅक्ट्री रीसेट तुमच्या स्मार्टफोनला पुन्हा फास्ट, स्मूद व नव्यासारखा बनवण्याची चांगली पद्धत आहे. स्मार्टफोन रीसेट करण्यापूर्वी तुमच्या मोबाइल फोनच्या डेटा बॅकअप घेणं आवश्यक आहे. तुम्ही मोबाइलमधील सर्व ॲप्स, फोटो, व्हिडीओ तसेच अन्य फाईल्स देखील तुमच्या डाटा बॅकअपमध्ये घेऊ शकता. फोन बॅकअप स्मार्टफोनमधील मायक्रोएसडी कार्ड किंवा गुगलमध्ये स्टोर केला जाऊ शकतो, त्यामुळे फोन फॅक्ट्री रीसेट झाल्यानंतर पुन्हा रिकव्हर करता येईल.

**अँड्रॉइड अपडेट**

अँड्रॉइड स्मार्टफोन्स गुगलद्वारे बनवण्यात येणाऱ्या अँड्रॉइड ओएसवर चालतात. ही कंपनी दरवर्षी आपल्या अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टमचं नवीन व्हर्जन घेऊन येते ज्यात अनेक नवीन अपडेट असतात. विशेष म्हणजे अँड्रॉइड ओएसचा नवीन अपडेट फक्त नवीन फीचर्स घेऊन येत नाही तर त्यात अनेक बग्स काढले जातात. वेगवेगळ्या ॲप्स, वेबसाइट्स, गेम्स, ऑनलाइन ॲक्टिव्हिटी तसेच इंटरनेट ॲक्सेसमुळे तुमच्या स्मार्टफोनमध्ये अनेक प्रकारचे बग्स देखील येतात त्यामुळे फोनच्या प्रोसेसिंगवर एक्स्ट्रा लोड येतो. हे बग्स फक्त प्रोसेसिंग स्लो करत नाहीत तर अनेक ॲप्सवर देखील प्रभाव टाकतात. अँड्रॉइड अपडेट्समध्ये डेव्हलपर हे बग्स काढून टाकण्याचे कोड टाकतात. त्यामुळे तुमचा स्मार्टफोन कायम नवीन अँड्रॉइड व्हर्जनवर अपडेट करावा.

**फोन स्टोरेज**

फोनची स्टोरेज भरल्यामुळे डिव्हाइसच्या प्रोसेसिंगवर प्रभाव पडतो आणि तो स्लो होतो. Support.google नुसार जर तुमच्या स्मार्टफोनची स्टोरेज ९० टक्क्यांपर्यंत फुल होते तेव्हा फोनमध्ये प्रॉब्लम येण्यास सुरुवात होऊ शकते. अशावेळी तुमच्या फोन स्टोरेज वर लक्ष ठेवावं आणि अनावश्यक फोटोज व व्हिडीओज डिलीट करावे. अत्यावश्यक मीडिया फाइल्सचा इतरत्र बॅकअप घेऊन मोबाइलमधून काढून टाकाव्यात.

**लाइट अँड्रॉइड ॲप्सचा वापर**

लाइट अँड्रॉइड ॲप्स जुन्या मोबाइल फोन्ससाठी उपयुक्त ठरू शकतात. हे ॲप्स फोनमध्ये कमी स्टोरेज वापरतात तसेच जास्त इंटरनेट देखील वापरत नाहीत. असे ॲप्स वापरल्यावर फोनच्या प्रोसेसर व बॅटरीवर देखील जास्त लोड येत नाही. विशेष म्हणजे लाइट अँड्रॉइड ॲप्स फुल व्हर्जनच्या फास्ट असतात. हे लाइट अँड्रॉइड ॲप्स कमी रॅम व जुन्या प्रोसेसरवर देखील स्मूद तसेच लॅगफ्री चालतात. उदा. जीमेल गो, गुगल गो, यूट्यूब गो आणि मॅप्स गो तसेच फेसबुक लाइट, मॅसेंजर लाइट, इंस्टाग्राम लाइट इत्यादी.

## 'या' समस्यांना टाळायचं असेल तर साखरेला ठेवा दूर!

**आपल्या** रोजच्या आहारात कमी अधिक प्रमाणात साखरेचं प्रमाण चांगलंच असतं. काही वेळा प्रत्यक्षरीत्या तर काही वेळा अप्रत्यक्षरीत्या साखर आपल्या शरीरात जात असते. साखर शरीरासाठी आवश्यक घटक आहे. मात्र या साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्याचीही तितकीच गरज आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा घातक ठरू शकतो. त्याप्रमाणेच साखरेचंही आहे. शरीरात साखरेचं प्रमाण अधिक असेल तर अनेक आजारांना सामोरं जावं लागतं. त्यामुळे आहारात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे.



- आहारात साखरेचं प्रमाण जास्त असेल तर त्याचा परिणाम थेट तुमच्या चेहऱ्यावर दिसून येतो. त्यामुळे साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे. शरीरात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर त्वचेचा पोत सुधरतो. त्वचा मुलायम आणि तजेलदार होते. विशेषतः रात्रीच्या वेळी साखरयुक्त पदार्थ कमी खाल्ले तर चेहऱ्यावर सुरकुत्या येत नाहीत. तसंच चेहऱ्यावरील मुरुम, डागही क मी होतात.
- साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर शांत झोप लागते.
- साखर जास्त खाल्ल्याने जळजळ आणि श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होतो.
- साखर खाल्ल्यामुळे वजन झपाट्याने वाढतं. त्यामुळे डोनट्स, पेस्ट्री, केक, मिठाई असे पदार्थ शक्यतो खाणं टाळा.
- साखरेचे प्रमाण जास्त असल्यास स्मरणशक्ती कमकुवत होते.
- साखरेमुळे मधुमेह होण्याची शक्यता असते.

# ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उपाय...

ओठ काळसर पडण्यामागे अनेक कारणे असू शकतात. असंतुलित आहार, पिग्मेंटेशन, खूप वेळ उन्हामध्ये वावरणे, हलक्या प्रतीची प्रसाधने, विशेषतः हलक्या प्रतीची लिपस्टिक वापरणे, अशा किती तरी कारणांमुळे ओठ काळसर पडू शकतात. पण काही साध्या उपायांचा अवलंब केल्यास ओठांचा रंग पुन्हा पूर्ववत होण्यास सहाय्य मिळते.

**ग्रीन टी**

आपण दिवसभरात अनेकदा चहा किंवा कॉफी घेत असतो. पावसाळ्यात किंवा थंडीच्या मोसमात तर चहा किंवा कॉफी पिण्याचे प्रमाण अजूनच वाढते. पण चहा किंवा कॉफीच्या अतिसेवनाने देखील ओठ काळसर दिसू शकतात. त्यामुळे दिवसातून अनेकदा चहा किंवा कॉफी घेण्यापेक्षा, ग्रीन टीच्या सेवनाचे प्रमाण वाढवा. ग्रीन टीमध्ये असलेले पॉलिफेनॉल्स शरीरातील फ्री रॅडिकल्स कमी करून, उन्हामुळे किंवा चहा - कॉफीच्या अतिसेवनाने काळसर पडलेले ओठ पुन्हा पूर्ववत करण्यास मदत करतात. ग्रीन टी च्या टी-बॅग्स थोड्याशा पाण्याने ओलसर करून घेऊन, त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज केल्यासही ओठांचा काळसरपणा दूर होण्यास मदत मिळते, तसेच ओठ मऊ राहतात.



**नारळ :** आपल्या आहारात नारळाचा समावेश अवश्य करा. हे आपल्याला निरनिराळ्या प्रकारे करता येईल. नारळाचे पाणी प्या, त्याचे ताजे खोबरे भाज्यांवर किंवा गरमागरम पोहे, उपमा, खिचडीवर घालून खा किंवा कुठल्याही भाजीच्या ग्रेव्हीमध्ये नारळाचे दूध वापरा. नारळाचे तेलही स्वयंपाकामध्ये वापरता येऊ शकेल. नारळाच्या सेवनाने त्वचा नितळ राहते. नारळाचे तेल दररोज ओठांना लावल्यास ओठ गुलाबी व मऊ राहतील.

**मध :** रात्री झोपण्यापूर्वी थोड्या मधाने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. हे मध रात्रभर ओठांवर तसेच राहू द्यावे. मधाचा वापर आपल्या आहारामध्येही नियमित करावा. मधात अँटी ऑक्सिडंट्स व मॅग्नेशियम हा क्षार भरपूर प्रमाणात असल्यामुळे ओठांना मृदुता प्राप्त होऊन, त्यांचा काळसरपणा दूर करण्यास मध उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे टोमॅटोही ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उत्तम आहेत. यामध्ये असलेले सेलेनियम सूर्याच्या प्रखर उन्हापासून ओठांचे रक्षण करते. टोमॅटोचा वापर आपल्या आहारामध्ये तर करावाच, शिवाय उन्हामधून फिरून आल्यानंतर त्वरित टोमॅटोची पेस्ट ओठांवर लावावी. असे केल्याने, उन्हामुळे ओठांवर आलेला काळसरपणा दूर होतो.



**अक्रोड :** अक्रोडमध्ये असलेले ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स त्वचेमधील कोलाजेन वाढवण्यास सहाय्य करतात. त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढल्याने त्वचा लवचिक होते. अक्रोडची जरा जाडसर पेस्ट बनवून त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. असे केल्याने ओठांच्या त्वचेवरील मृत पेशी निघून जाऊन ओठांचा काळसर पडलेला रंग हलका होण्यास मदत होईल. तसेच दह्याच्या वापराने त्वचा नितळ होऊन त्यावरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत मिळते. त्यामुळे आपल्या आहारामध्ये दह्याचा समावेश अवश्य करावा. दह्यामध्ये थोडेसे केशर घालून त्याने ओठांचा मसाज केला असता, ओठांवरील पिग्मेंटेशनमुळे आलेला काळसरपणा दूर होण्यास मदत मिळेल.

**लिंबाचा रस :** आपल्या शरीरामधील ॲसिड्स व तीव्र अल्कलींमुळे ओठ काळसर पडू शकतात. गरम पाण्यामधून लिंबाचा रस घेतल्याने शरीरामधून ही ॲसिड्स व अल्कली बाहेर टाकण्यास मदत मिळते. लिंबू हे अत्यंत प्रभावी ब्लीच आहे. थोडीशी साखर एका लिंबाच्या लहान फोडीवर घालून त्याने ओठ चोळल्यास ओठांचा काळसरपणा दूर होतो. त्याचप्रमाणे ॲलो व्हेरा किंवा कोरफड, ओठांचा काळसरपणा दूर करण्यास उपयुक्त आहे. ॲलो व्हेराच्या रसाचा समावेश आपल्या आहारात करावा आणि त्याच्या गराने ओठांवर नियमित मसाज करावा. या उपायाने ओठांचा काळसरपणा दूर होऊन ओठ पुनश्च गुलाबी व मृदू होतील.



# पी हळद आणि हो बरी

**मराठीत** एक म्हण आहे. पी हळद अन् हो गोरी. या म्हणीचा अर्थ काही वेगळा आहे. कोणत्याही उपायाचा परिणाम पटकन होत नसतो. हळद प्यायल्यावर लगेच कोणी गोरी होत नसते असे या म्हणीतून सुचवायचे आहे, पण प्रत्यक्षात मात्र हळद ही काही बाबतीत चटकन आणि बराच गुण देणारी आहे. असे काही प्रयोगातही दिसून आले आहे. काही लोकांनी हळद मिसळलेले पाणी दररोज सकाळी प्राशन करून त्याचे फायदे नोंदवले आहेत तर काहींनी हळदीचा चहा किती गुणकारी असतो याचा अनुभव घेतला आहे. दररोज सकाळी साधारण ग्लासभर पाणी घ्यावे. ते गरम करावे आणि कोमट झाल्यावर त्यात अर्धा चमचा हळद मिसळावी. हे पाणी थंड झाल्यावर प्यावे त्याचे अनेक फायदे होतात.



हळद ही जंतुनाशक असते. त्यामुळे ती अनेक रोगांचा सामना करण्यास उपयोगी पडते. काही वेळा ती काही रेडिएशन्सचाही प्रतिकार करण्यास फायदेशीर ठरली आहे. सध्या आपण मोबाईल फोन फार वापरतो आणि त्याच्या रेडिएशन्सचा आपल्यावर काही परिणाम होण्याची शक्यता असते. आपल्याला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात हळद वापरायला मिळाली तर अशा परिणामांपासून आपण दूर राहू शकतो. हळद पाण्यात मिसळून प्यावी किंवा आहारात तिचा समावेश अवश्य होईल याची दक्षता घ्यावी. आपल्या समाजात दूध आणि हळद पिण्याची पद्धत आहे. त्यामुळे बसलेला घसा मोकळा होतो. घशाला कसला संसर्ग झाला असेल तर हळद आणि दूध गुणकारी ठरते. खोकला आल्यावर तर हळद आणि दूध घेतातच. ते घेतल्यावर दुसरे कसलेही औषध घेण्याची गरज नाही असे मानतात.

काही लोक हळदीचा चहा तयार करतात. तो तयार करण्याची पद्धत आहे. कपभर पाण्यात चमचाभर हळद टाकून हे मिश्रण उकळा. नंतर त्याला खाली उतरवून त्यात थोडा मध टाका. त्याशिवाय त्यात थोडे लिंबू पिळा किंवा त्यात संत्र्याचा रस मिसळा. त्यामुळे या मिश्रणाला चांगली चव येईल. असा हा चहा प्याल्याने वजन कमी होण्यास मदत होते. संधिवाताचा त्रास कमी होतो. शिवाय यात काही मिनरल्स रोगप्रतिकारक आणि कर्करोगास प्रतिबंध करणारे आहेत. जगाच्या काही भागात हळदीचा असा चहा फार लोकप्रिय आहे. कारण त्यामुळे मधुमेहाचा उपद्रव कमी होतो. हळद हे अगदी सहजगत्या उपलब्ध होणारे औषध आहे. त्याचा वापरही आपण करीत असतो, पण त्याचे अनेक फायदे आपल्याला माहीतही नसतात.

**कोणत्या १२ जिल्हा परिषदांसाठी निवडणूक?**

पुणे, सातारा, सांगली, परभणी, लातूर, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, सोलापूर, कोल्हापूर,रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांसाठी ही निवडणूक असेल. यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया १६ जानेवारीपासून सुरू होणार आहे. तर, २७ जानेवारी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत असेल. घोषणा झालेल्या सर्वच जिल्हा परिषदांचे आरक्षण ५० टक्क्यांच्या आत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा वर गेलेल्या जिल्हा परिषदांची निवडणूक दुसऱ्या टप्प्यात होणार आहे.

# राज्य निवडणूक आयोगाची मोठी घोषणा!

## १२ जिल्हा परिषदा, १२५ पंचायत समितीसाठी ५ फेब्रुवारीला मतदान

■ **बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

राज्य निवडणूक आयोगाने अखेर राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांसाठी निवडणुकीची घोषणा केली आहे. येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदान होईल. तर, ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी अर्थात निकालांची घोषणा केली जाईल. प्रत्येक मतदाराला २ मते, एक मत जिल्हा परिषद व दुसरे पंचायत समितीसाठी असेल. मंगळवारी दुपारी चारच्या सुमारास सह्याद्री अतिथिगृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत याबाबतची घोषणा करण्यात आली.




गेल्या वर्षी सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला ३१ जानेवारीपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने राज्यात पहिल्या टप्प्यात नगरपंचायत व नगरपरिषदांची निवडणूक घेतली. त्यानंतर सध्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या २९ महापालिकांच्या निवडणुकांची तयारी सुरू आहे. निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका घेण्यासाठी अतिरिक्त मुदत मागितली होती. मात्र, कोर्टाने केवळ १५ दिवसांची मुदत देत निवडणूक कार्यक्रम १५ फेब्रुवारीपर्यंत संपवण्याचे आदेश दिले होते.

**निवडणूक वेळापत्रक**

- १६ जानेवारी : निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार
- १६-२१ जानेवारी : उमेदवारी अर्ज सादर करण्याची मुदत
- २२ जानेवारी : अर्ज छाननी
- २७ जानेवारी (३ वाजेपर्यंत) : अर्ज मागे घेण्याची अंतिम वेळ
- २७ जानेवारी (३.३० नंतर) : अंतिम उमेदवार यादी आणि चिन्ह वाटप
- ५ फेब्रुवारी : मतदान
- ७ फेब्रुवारी : मतमोजणी

# प्रचाराच्या तोफा थंडावणार

## लगेच ४ दिवस ‘ड्राय डे’ लागू होणार, राज्य सरकारचा निर्णय

■**मुंबई। प्रतिनिधी,**

१५ जानेवारी रोजी होणाऱ्या महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने १३ ते १६ जानेवारी या चार दिवसांचा ‘ड्राय डे’ जाहीर केला आहे. मतदान होणाऱ्या २९ महापालिका क्षेत्रांमध्ये या कालावधीत मद्याची विक्री, खरेदी आणि सेवन पूर्णतः बंद राहणार आहे.



**प्रचाराची मुदत संपताच ड्राय डे लागू**

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, शांततेत प्रचार व मतदान प्रक्रिया पार पाडणे आणि मुक्त व निष्पक्ष निवडणुका सुनिश्चित करणे या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. १३ जानेवारीला प्रचाराची मुदत संपताच (जाहीर सभा, रॅली आदी बंद झाल्यानंतर) ड्राय डे लागू होईल. म्हणजे मंगळवारी सायंकाळी ६ वाजेपासून पुढील चार दिवस राज्यात सर्व २९ महापालिका क्षेत्रात 'ड्राय डे' असणार आहे.

**बार, परमिट रूम्सही बंद; उल्लंघन केल्यास कारवाई**

या चार दिवसांत संबंधित महापालिका हद्दीत दारूची दुकाने, बार, परमिट रूम्स तसेच मद्यविक्री करणारी सर्व आस्थापने बंद ठेवण्यात येतील. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर लागू कायद्यांनुसार कडक कारवाई व दंडात्मक शिक्षा केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

नागरिक, मतदार आणि व्यावसायिकांनी या निर्बंधांना सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. एका अधिकाऱ्याने सांगितले की, “निवडणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी ड्राय डे ही प्रतिबंधात्मक उपाययोजना आहे.”

# वंशाला दिवा नाही... छळाला कंटाळून २५ वर्षीय विवाहितेने आयुष्य संपवलं

■**बीड। प्रतिनिधी,**

“तुला तीन मुलीच झाल्या, आमच्या वंशाला दिवा नाही,” असे टोमणे मारत सासरकडून होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून २५ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना केज तालुक्यातील उंदरी येथे घडली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, लातूर जिल्ह्यातील आजरखेडा, तालुका रेणापूर येथील प्रकाश सूर्यवंशी यांची मुलगी अरुणा हिचा विवाह १६ ऑगस्ट २०१९ रोजी केज तालुक्यातील उंदरी येथील उद्धव ठोंबरे यांच्याशी झाला होता. लग्नानंतर सुरुवातीच्या काळात उद्धव ठोंबरे बँकेत नोकरी करत होते. मात्र नंतर त्यांनी नोकरी सोडून शेती व्यवसाय सुरू केला. दरम्यान, अरुणा आणि उद्धव यांना एकूण तीन मुली झाल्या. मोठी मुलगी कु. राजनंदिनी (वय ५ वर्षे) तसेच कु. आर्या आणि कु. अपूर्वा (वय ४ वर्षे) या जुळ्या मुली आहेत. तीन मुली झाल्याच्या कारणावरून अरुणा हिला सासरी सातत्याने त्रास दिला जात होता. पहिल्या मुलीनंतर पुन्हा दोन जुळ्या मुली झाल्याने नवरा उद्धव ठोंबरे



हा दारू पिऊन अरुणा हिच्याशी शिवीगाळ व मारहाण करत असल्याचा आरोप आहे.

इतकेच नव्हे तर सासू इंदुबाई उत्तम ठोंबरे आणि सासरे उत्तम रघुनाथ ठोंबरे हे देखील “आम्हाला मुलगा हवा होता, तुला तर ३-३ मुली झाल्या, तू आमचा वंश बुडविला,” असे म्हणत तिला घालून-पाडून बोलत, शिवीगाळ करून मानसिक त्रास देत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या सततच्या अपमानामुळे अरुणा मानसिकदृष्ट्या खचली होती. सासरकडून होत असलेल्या छळाबाबत अरुणा हिने आपल्या आई-वडिलांना, भावाला तसेच मोठी बहीण करुणा हिला वेळोवेळी फोनवरून व माहेरी आल्यानंतर सांगितले होते. “मला आता सासरी नांदायला जायचे नाही,” असे ती वारंवार म्हणत असल्याचेही नातेवाइकांनी सांगितले. मात्र, माहेरच्या मंडळींनी तिची समजूत काढत तिला धीर देण्याचा प्रयत्न केला होता. अखेर या सर्व त्रासाला कंटाळून अरुणा ठोंबरे हिने दि. १० जानेवारी रोजी दुपारी सुमारे २:०० वाजण्याच्या सुमारास उंदरी येथील राहत्या घरी घरातील फॅनला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली.

या प्रकरणी अरुणा ठोंबरे हिचा भाऊ गोविंद सूर्यवंशी यांच्या तक्रारीवरून युसुफवडगाव पोलिस ठाण्यात उद्धव ठोंबरे, त्याची आई इंदुबाई ठोंबरे आणि वडील उत्तम ठोंबरे यांच्याविरुद्ध गु. र. नं. ०९/२०२६ अन्वये भा. न्या. सं. कलम ८५, १०८, ११५(२), ३५२, ३(४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक भारत बरडे हे करीत आहेत. अरुणा ठोंबरे हिच्या मृत्यूनंतर कु. राजनंदिनी (वय ५ वर्षे), कु. आर्या आणि कु. अपूर्वा (वय ४ वर्षे) या तिन्ही चिमुकल्या आईच्या मायेला मुकल्या असून त्यांच्या भवितव्याबाबत हळहळ व्यक्त केली जात आहे.

# खाकी वर्दीची प्रतिमा मलीन करणारा प्रकार

## बीडमध्ये पोलीस दलातील कर्मचाऱ्याने तरुणीला लग्नाचं आमिष दाखवत केलं लैंगिक शोषण




**पोलीस दलातील सैनिकानं तरुणीशी जवळीकता साधली**

घडलेल्या घटनेनुसार, पीडित तरुणी आष्टी तालुक्यातील एका गावातील रहिवासी असल्याचं सांगण्यात येत आहे. आरोपी हा पीडितेच्या घरानजीकच राहतो. तो पीडितेला ओळखत होता, त्याचाच फायदा घेत त्यानं पीडितेशी जवळीकता साधली आणि तिला लग्नाचे आमिष दाखवले. पीडितेचा विश्वास संपादन केल्यानंतर त्याने तिला लग्नाचे आश्वासन दिले होते. पीडितेच्या आई-वडील घरी नसताना किंवा संधी मिळेल तेव्हा आरोपीने पीडितेच्या घरात जाऊन तिच्यावर अनेकदा संशय व्यक्त केला होता. तिने अनेकदा पीडितेचे लैंगिक शोषण केले होते. याच काळात पीडितेनं त्याला अनेकदा लग्नाविषयी विचारले असता, तेव्हा तो काहीबाही सांगून विषय टाळून द्यायचा.

■**बीड। प्रतिनिधी,**

समाजाच्या रक्षणाची ज्यांच्या खांद्यावर जबाबदारी असते, अशाच एका पोलीस दलातील कर्मचाऱ्याने एका तरुणीचा विश्वासघात केल्याची धक्कादायक घटना घडली. लग्नाचे आमिष दाखवून एका २५ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याचा माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार आता उघडकीस आला आहे. या प्रकरणी नराधम पोलीस कर्मचाऱ्याविरोधात अंभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेनं संपूर्ण बीड हादरून गेलं आहे. या घटनेनं पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाल्याचं चित्र आता समोर आलं आहे.

**लग्नाचं आमिष दाखवून केलं लैंगिक शोषण**

काही दिवसांपूर्वी पीडितेनं लग्नासाठी पोलिसांकडे तगादा लावून धरला होता. तेव्हा आरोपीने लग्नास नकार दिला होता. पीडितेला आपली फसवणूक झाल्याचं लक्षात येताच त्यांनी अंभोरा पोलीस ठाणे गाठलं आणि आपल्यासोबत घडलेला एकूण प्रकार सांगितला. पीडितेनं दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित पोलीस कर्मचाऱ्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

**पोलीस कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल**

पोलीस कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल झाल्याने पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. या प्रकरणाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास अंभोरा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे करत आहेत. आरोपी सुट्टीवर असताना त्यानं हे कृत्य केले, तसेच यात इतर काही बाबी आहेत का, याचा शोध पोलीस घेत आहेत.

या घटनेमुळे पीडित तरुणीच्या कुटुंबाला मोठा मानसिक धक्का बसला असून, आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी परिसरातून होत आहे. रक्षकच भक्षक बनल्याने महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# अँटॉप हिलमध्ये पाळीव कुत्र्याच्या भुंकण्यावरून वाद, १५ वर्षीय मुलावर चाकूहल्ला...

■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील अँटॉप हिल परिसरात कुत्र्याच्या भुंकण्यावरून झालेला किरकोळ वाद थेट हाणामारीत बदलला. गुरुवारी (दि. ८) राज हाइट्स टॉवर इमारतीत ही घटना घडली. या हल्ल्यात एका १५ वर्षीय मुलासह कुटुंबातील अनेक जण जखमी झाले आहेत.

**कुत्र्याच्या भुंकण्यावरून शाब्दिक वाद**

एफआयआरनुसार, तक्रारदार नरेश उदयभान बिडलान (वय ४७), हे बीएमसीमध्ये सफाई कर्मचारी आहेत. ते पत्नी वंदना आणि पुतण्या आर्यन कागड्रा (१५) यांच्यासोबत रात्री १०.३० वाजता पाळीव कुत्र्याला फिरवून घरी जात होते. लिफ्टजवळ थांबले असताना त्यांचे शेजारी लक्ष्मी डिक्का यांच्या नातेवाईक मुलावर त्यांचा कुत्रा भुंकला. यावरून दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला.

**लाकडी काठीने मारहाण**

बिडलान यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाद वाढल्यानंतर त्यांना शिवीगाळ करण्यात आली. परिस्थिती शांत करण्याचे प्रयत्न सुरू असतानाच नितीन डिक्का (वय २५) घटनास्थळी आला आणि त्याने लाकडी काठीने बिडलान यांना मारहाण केली. यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

**संपूर्ण इमारतीत दहशतीचे वातावरण**

एफआयआरमध्ये नमूद केल्याप्रमाणे, संजना नावाच्या एका महिलेनेही बांबूच्या काठीने बिडलान यांच्या डोक्यावर प्रहार केला. याच वेळी अमन आणि तुषार यांनी आर्यनला मारहाण केली, तर जमावातील एका अज्ञात व्यक्तीने आर्यनच्या पाठीवर आणि हातावर चाकूने वार केला. या गोंधळात बिडलान यांची पत्नी वंदना यांनाही मारहाण करण्यात आली. झटापटीदरम्यान त्यांचे मंगळसूत्र तुटून हरवले. शेजाऱ्यांनी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला असता, नितीन डिक्काने बांबूची काठी दाखवत त्यांना धमकावले. त्यामुळे संपूर्ण इमारतीत दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**गुन्हा दाखल... पोलिसांकडून तपास सुरू**

मिळालेल्या माहितीनुसार, जखमींना सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अँटॉप हिल पोलिसांनी नितीन डिक्का, तुषार, सविता, अमन, कविता आणि शरणजीत यांच्यासह काही अज्ञात व्यक्तींविरोधात भारतीय न्याय संहिता आणि फौजदारी कायदा दुरुस्ती कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिस सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पुढील तपास करत आहेत.




# पतीने पोलीस ठाण्यातच पत्नीवर झाडली गोळी अन्...

■**मुंबई। प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील हरदोई जिल्ह्यातून एक भयंकर घटना समोर आली आहे. पोलीस कोठडीत असलेल्या एका 35 वर्षीय महिलेची तिच्या पतीने दिवसाढवळ्या गोळी झाडून हत्या केल्याचं वृत्त आहे. संबंधित घटना बानगी पोलीस स्टेशन परिसरात घडली. घटनेतील पीडित महिलेचं नाव सोनी असून तिच्या पतीचं नाव अनूप असल्याची माहिती आहे. घटनेनंतर, गंभीररित्या जखमी झालेल्या महिलेला तातडीने जिल्हा रुग्णालयात नेण्यात आलं, तिथे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाल्याचं सांगितलं जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रामापूर अटरिया गावातील रहिवासी असलेला अनूप आणि त्याची पत्नी सोनी दोघे गुरुग्राममध्ये काम करत होते. तिथे सुरजीत नावाच्या एका तरुणासोबत सोनीची ओळख झाली आणि त्या दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. अनूपला आपल्या पत्नीच्या विवाहबाह्य संबंधाची माहिती मिळताच त्याने सोनीला त्याच्या गावी सोडलं. परंतु, 7 जानेवारी रोजी सोनी तिचा प्रियकर सुरजीतसोबत घरातून पळून गेली. अनूपने याप्रकरणी सुरजीतविरुद्ध ऋक्ष्फ दाखल केली होती.

अनूपने केलेल्या आरोपानुसार, सोनी तिच्यासोबत तिचे दागिने आणि घरातील 35,000 रुपये रक्कम घेऊन गेली होती. पोलिसांनी या प्रकरणात कारवाई करत सोनीला रविवारी ताब्यात घेतलं आणि सोमवारी सकाळी तिला कोर्टात सादर करण्याची तयार सुरू होती. सकाळी जवळपास 10.45 वाजता एक महिला कॉन्स्टेबल सोनीला पोलीस ठाण्याच्या कॅन्टीनच्या दिशेने घेऊन जात होती. तिथे सोनीचे नातेवाईक आणि पती अनूप तिला समजवण्यासाठी आले होते.

**राग अनावर होताच पत्नीवर गोळी झाडली अन्...**

दरम्यान, अनूपचा राग अनावर झाला आणि संधी मिळताच त्याने सोनीवर बेकायदेशीर पिस्तूलने गोळी झाडली. गोळी झाडण्याचा आवाज येताच, परिसरात एकच खळबळ उडाली. गोळी लागल्यानंतर, सोनी रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळली. त्यावेळी, पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या अनूप आणि त्याच्या एका साथीदाराला पोलिसांनी घेरलं आणि घटनास्थळावरूनच त्याला ताब्यात घेण्यात आलं. हत्येत वापरण्यात आलेलं हत्यारसुद्धा पोलिसांनी जप्त केल्याची माहिती आहे.

# बडतर्फ आयएएस पूजा खेडकरला बांधून ठेवलं

## आई-वडिलांना गुंगीचं औषध दिलं, घरातील नेपाळी नोकर मोबाईल घेऊन पळाला

■**मुंबई। प्रतिनिधी,**

आयएएस पदावरून बडतर्फ करण्यात आलेल्या डॉ. पूजा खेडकर यांनी त्यांच्या पुण्यातील राहत्या घरात चोरी झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. या संदर्भात त्यांनी चतुःश्रृंगी पोलीस ठाण्यात माहिती दिली असून, बाणेर रस्त्यावरील खेडकर कुटुंबाच्या बंगल्यात ही घटना घडल्याचे सांगितले जात आहे. ही घटना शनिवारी (दि.१० जानेवारी २०२६) रात्री घडल्याचा दावा करण्यात आला आहे.

पोलिसांकडे देण्यात आलेल्या प्राथमिक माहितीनुसार, खेडकर कुटुंबाकडे काम करणाऱ्या एका नोकरानेच हा प्रकार केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. संबंधित नोकराने दिलीप खेडकर आणि मनोरमा खेडकर यांना गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर त्याने डॉ. पूजा खेडकर यांना दोरीने बांधून ठेवत घरातील मोबाईल फोन घेऊन पळ काढल्याचे सांगण्यात येत आहे.

या प्रकरणातील संशयित नोकर अवघ्या आठ दिवसांपूर्वी नेपाळमधून पुण्यात आला होता, अशी माहितीही पोलिसांकडून समोर आली आहे. तो काही दिवसांपासून खेडकर कुटुंबाच्या बंगल्यात काम करत होता. घटनेच्या वेळी घरात इतर कोणी उपस्थित नव्हते, अशी माहिती प्राथमिक तपासात समोर आली आहे. घटनेनंतर डॉ. पूजा खेडकर या बांधलेल्या अवस्थेत असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, त्यांनी दाराच्या कडीचा वापर करून स्वतःला सोडवून घेतले. त्यानंतर घरात उपलब्ध असलेल्या दुसऱ्या मोबाईल फोनवरून त्यांनी चतुःश्रृंगी पोलिसांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली.

माहिती मिळताच चतुःश्रृंगी पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घराची पाहणी केली असता दिलीप खेडकर आणि मनोरमा खेडकर हे दोघेही बेशुद्ध अवस्थेत आढळून आले. पोलिसांनी तत्काळ त्यांना उपचारासाठी एका खासगी रुग्णालयात दाखल केले. उपचारानंतर त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. दरम्यान, या घटनेप्रकरणी अद्याप कोणतीही लेखी तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. मनःस्थिती स्थिर झाल्यानंतर तक्रार दिली जाईल, असे डॉ. पूजा खेडकर यांनी पोलिसांना कळवले आहे. सध्या या प्रकरणी केवळ प्राथमिक माहितीच्या आधारे पोलिसांकडून तपास सुरू आहे.



घरातून मोबाईल फोन व्यतिरिक्त इतर कोणतीही मौल्यवान वस्तू किंवा रोख रक्कम चोरीला गेली आहे की नाही, याबाबत सध्या कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. पोलिसांकडून याची पडताळणी केली जात असून पुढील तपास सुरू आहे. या संपूर्ण घटनेचा अधिक तपास चतुःश्रृंगी पोलीस करत असून, संशयित नोकराचा शोध घेण्यासाठी विविध पथके काम करत आहेत. संबंधित नोकराचा शोध लागल्यानंतरच या प्रकरणातील नेमकी माहिती समोर येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

**जिल्हाधिका यांनी दिली माहिती**

गरियाबंदचे जिल्हाधिकारी भगवान सिंह उइके यांनी माध्यमांना माहिती दिली की, राज्य प्रशासकीय सेवा अधिकारी असलेले रऊड (महसूल) तुलसीदास मरकम यांना त्यांच्या पदावरून काढून टाकण्यात आलं आहे. पुढे ते म्हणाले की, तपास पूर्ण झाल्यानंतर, अहवाल रायपूर विभागीय आयुक्तांना पाठवला जाईल. त्यानंतर नियमांनुसार पुढील कारवाईचा निर्णय घेतला जाईल. शो-कॉज नोटिसनुसार, संबंधित अश्लील नृत्य कार्यक्रम 5 जानेवारी ते 9 जानेवारी असे चार दिवस सुरू होता. दरम्यान, या कार्यक्रमातील रऊड चे फोटो आणि व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले. मात्र, त्यांच्यावर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही.

# अश्लील डान्स पाहण्यात अधिकारी दंग... पीसीएस अधिकाऱ्यासह तीन पोलिसांची मस्ती, पैसे उडवतानाचा व्हिडीओ व्हायरल

■**मुंबई। प्रतिनिधी,**

छत्तीसगढच्या गरियाबंद जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका ऑर्केस्ट्रा कार्यक्रमात अश्लील नृत्य सादर होत असताना उपविभागीय अधिकारी आणि पोलिसांची उपस्थिती असल्याचं समोर आलं. सोशल मीडियावर त्यांचा व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर, पोलीस प्रशासनावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आता या प्रकरणात, रऊड ला त्यांच्या पदावरून काढून टाकण्यात आलं असून तीन पोलीस कर्मचा ्यांना निलंबित करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे.

हे संपूर्ण प्रकरण गरियाबंद जिल्ह्यातील देवभोग पोलीस स्टेशन हद्दीत आयोजित केलेल्या एका ऑर्केस्ट्रा कार्यक्रमाशी संबंधित आहे. मागील आठवड्यातच, उरमाल गावात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दरम्यान, या कार्यक्रमात अश्लील नृत्य सादरीकरण सुद्धा झालं आणि रविवारी या



कार्यक्रमाचे व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाले आहेत. या व्हायरल व्हिडीओमध्ये कार्यक्रमात पीसीएस आणि इतर पोलीस कर्मचारी उपस्थित असल्याचं स्पष्टपणे दिसून आलं. इतकेच नव्हे तर, अश्लील डान्स बघण्यासोबत ते पैसे उडवताना आणि व्हिडीओ रेकॉर्ड करताना देखील दिसून आले. या फोटो आणि व्हिडीओमुळे प्रकरण अधिक चर्चेत आलंय.

**14 आयोजकांना अटक**

वरिष्ठ पोलीस अधिका ्यांच्या माहितीनुसार, या प्रकरणासंबंधी ऋक्ष्फ दाखल करण्यात आला असून कार्यक्रमाच्या आयोजन समितीच्या 14 सदस्यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, नियमांचं पालन न केल्याप्रकरणी आणि अश्लील कार्यक्रम आयोजित केल्याच्या आरोपाखाली ही कारवाई केली गेली आहे. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या तीन पोलिस अधिका ्यांना तात्काळ निलंबित करण्यात आलं आहे आणि त्यांच्यावर बेशिस्तपणा तसेच कर्तव्यात कसूर केल्याचा आरोप लावण्यात आला आहे. आता, पोलीस विभागाने त्यांच्याविरुद्ध विभागीय कारवाई सुरू केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com